**तात्काळ**
कालमर्यादित

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/स्वयंअशाळा इरादापत्र/पुवि/२०१६-२०१७/५५८४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 16 MAY 2023

प्रति,

प्राचार्या पवार पब्लिक स्कूल हिंजवडी पुणे

विषय : सन २०१३-२०१४ पासून सीबीएसई संलग्नित शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेल्या शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) २०१२ दिनांक १९.१.२०१३पासून अंमलात आल्यामुळे उक्त शाळा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर समजणेबाबत

संदर्भ : १. महाराष्ट स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मुंबई क्र. नाहप्र-२००९ (६६३/०९) माशि-१,दि. २०.६.२०१२

३. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम दिनांक १९.१.२०१३

४.शालेय शिक्षण विभागाकडील मान्यता आदेश जा.क्र. मान्यता २०१३/(२२/१३) माशि-१ दिनांक ७.३.२०१३

५.मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१७/प्र.क्र. ११६/एसएम-४, दिनांक २०.६.२०१७

६.श्री प्रदिप पडोळे कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र. १८४/एसएम-२ दिनांक १३.४.२०२३

वरील विषयी संदर्भीय क्र. १ व २ चे शासन निर्णयाचे व संदर्भीय क्र. ३ चे अधिनियमाचे अनुषंगाने संदर्भीय क्र. ४ नुसार पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, बॅलॉर्ड इस्टैट मुंबई व्दारा संचलित पवार पब्लिक स्कूल हिंजवडी पुणे या सी बी एस ई अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या इ. १ ते १२ वी पर्यंतच्या इंग्रजी माध्यम शाळेस कायम विना अनुदानीत तत्वावर माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच १ ते १९ अटी व शर्तीची पूर्तता करणेचे अधिन राहून शासन परवानगी दिलेली होती.

तदनंतर संदर्भीय क्रमांक ५ चे **शासन पत्रामधील अ.क्र. ७.२ स्वयंअर्थसहाय्यित शाळा मध्ये नमूद आहे की : राज्यामध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी व शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाकरिता ''कायम विना अनुदान तत्वावर'' नवीन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी ''महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) २०१२'' हा अधिनियम दिनांक १९ जानेवारी २०१३ पासून राज्यात अंमलात आला आहे. सदर अधिनियमानुसार ज्या शाळांना परवानगी देण्यांत आलेली आहे त्या शाळांना भविष्यात केंव्हाही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. दिंाक २० जुलै २००९ च्या शासन निर्णयामध्ये इंग्रजी माध्यम वगळून अन्य माध्यमाच्या शाळांचा ''कायम '' शब्द वगळण्यांत आला होता. तथापि , महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) २०१२ हा अधिनियम दिनांक १९ जानेवारी २०१३ पासून अंमलात आल्यामुळे या सर्व इंग्रजी माध्यमाच्या शाळा स्वयंअर्थसहाय्यित शाळा समजण्यांत याव्यात. त्यानुसार यु-डायस मध्ये तशा प्रकारची नोंद घेण्यांत यावी.**

तरी संदर्भ क्रमांक ६ च्या शासन पत्रात नमूद असलेनुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी संदर्भीय क्रमांक ६ चे शासन पत्राचे अनुषंगाने देण्यांत येत आहे.

| जिल्हा | अर्जदार संस्थेचे नांव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| पुणे | पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, बलार्ड स्टेट,मुंबई ०१ | पवार पब्लिक स्कूल, हिंजवडी पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी बी एस ई.) | इ. १ ली ते इ. १२ वी प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर | २०१७-२०१८ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शेक्षणिक वर्ष सन २०१७-२०१८ साठी निर्गमित चलन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

२.सदर शाळैने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व या अंतगत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तदतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३. संबंधित शाळैच्या व्यवस्थापनाने अधिष्नयम २००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादापत्र) देण्यांत येत आहे :

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-२०१७ करिता या शासन निणूयाव्दारे पात्र ठरविण्यांत आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्यबातल ठरेल.

क) शासन निर्णय दिनांक २० जून २०१६ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार सी बी एस ई मंडळाशी संलग्नतेकरिता नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळैने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/ यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता नाहरकत प्रमाणपत्र (N O C) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी नाहरकत (N O C) प्रमाणपत्र देईल.

३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (२०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रदद समजण्यात येईल.

७) युडायस डाटा : या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यांत आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-स्वयंअथ्रसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सर्व संबंधितांच्या माहितीकरिता स्वयंअथ्रसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहिर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

८) शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(औदुंबर उकिरडे)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१. श्री प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे